RNI No. MAHBIL/2009/31733.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार-अ

वर्ष २, अंक ९] शुक्रवार, एप्रिल २३, २०१०/वैशाख ३, शके १९३२ [पृष्ठे १५

किंमत : रुपये १९.००

असाधारण क्रमांक ६४

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

## सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ एप्रिल २०१०

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक रेशीम. १३२०००/प्र.क्र. ४/रेशीम कक्ष.— भारताचे संविधान यांच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या नियंत्रणाखालील रेशीम संचालनालयातील गट-अ मधील संचालक, उपसंचालक, सहायक संचालक, आणि श्रेणी-१, गट-ब मधील रेशीम विकास अधिकारी, या पदांच्या सेवा प्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, रेशीम संचालनालयातील गट-अ मधील संचालक, उपसंचालक, सहायक संचालक, आणि गट ब मधील रेशीम विकास अधिकारी, श्रेणी-१, या पदांचे सेवा प्रवेश नियम, २०१० असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,—

(क) " आयोग " याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, असा आहे ;

(ख) " पदवी " याचा अर्थ, सांविधीक विद्यापीठाची पदवी, असा आहे ;

(ग) " विभाग " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, असा आहे ;

(घ) " संचालक " याचा अर्थ, रेशीम संचालक, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ङ) " संचालनालय " याचा अर्थ, रेशीम संचालनालय, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(च) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(छ) " मान्यताप्राप्त गुणवत्ता " याचा अर्थ, ज्याचे पाच संशोधन निबंध प्रसिद्ध झाले आहेत ; त्यापैकी ३ आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित/निर्दिष्ट कालिकेत प्रसिद्ध झालेले असतील किंवा ज्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर एकस्व (पेटंट) प्राप्त झाले आहे, अशी गुणवत्ता असलेली व्यक्ती, असा आहे.

**गट-अ**

३. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या नियंत्रणाखालील रेशीम संचालनालयातील संचालक, या पदावरील नियुक्ती एकतर,

(क) उपसंचालक, रेशीम हे पद धारण करणाऱ्या पदावर आणि तीन वर्षांहून कमी नसेल इतकी नियमित सेवा केलेल्या व्यक्तीमधून वरिष्ठता लक्षात घेऊन, काटेकोर निवडीच्या आधारे, योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीद्वारे करण्यात येईल ;

**किंवा**

(ख) (एक) ज्यांचे वय चाळीस वर्षांहून जास्त नसेल :

परंतु, अगोदरच शासकीय सेवेत असलेल्या व्यक्तीबाबत वयोमर्यादा पाच वर्षपर्यंत शिथिल करण्यात येईल ;

(दोन) ज्याने कृषीशास्त्र / रेशीम / जीवशास्त्र / प्राणीशास्त्र / वनस्पतीशास्त्र अथवा वस्त्रोद्योग अभियांत्रिकी यांपैकी मुख्य विषय म्हणून कोणत्याही विषयासह विज्ञान शाखेतील प्रथम श्रेणीतील पदव्युत्तर पदवी धारण केलेली असेल ;

(तीन) वरील उपखंड ख (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता संपादन केल्यानंतर ज्याने कृषीशास्त्र / रेशीम / जीवशास्त्र / प्राणीशास्त्र / वनस्पतीशास्त्र या विषयातील किमान तीन वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव आणि कोणत्याही उद्योगामधील किंवा शासकीय विभागातील किंवा सार्वजनिक क्षेत्र उपक्रमातील किंवा शासनाने अथवा महामंडळाने स्थापन केलेल्या सांविधिक प्राधिकरणातील / महामंडळातील जबाबदारीच्या पदावरील प्रशासकीय कामाचा सात वर्षांचा अनुभव असा एकूण दहा वर्षांहून कमी नसेल इतका अनुभव धारण केला असेल किंवा संबद्ध विषयातील दहा वर्षांहून कमी नसेल इतका गुणवत्तापूर्ण संशोधन कार्याचा अनुभव धारण केला असेल ;

(चार) ज्याला मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :

परंतु, ज्या उमेदवाराकडे त्या विषयातील असामान्य शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही असेल अशा उमेदवारांबाबत आयोगाच्या शिफारशीनुसार, शासनाला, कमाल वयोमर्यादा शिथिल करता येईल :

परंतु, आणखी असे की, असामान्य अर्हता असणाऱ्या उमेदवारांबाबत आयोगाच्या शिफारशीनुसार, अनुभवाचा कालावधी शासनाला ४० टक्क्यांपर्यंत शिथिल करता येईल :

परंतु असेही की, संबंधित विषयात असामान्य शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

**किंवा**

(ग) शासनाच्या इतर विभागात समकक्ष पद धारण करणाऱ्या आणि या नियमाच्या उपखंड (ख) (दोन) आणि उपखंड (ख) (तीन) मध्ये नमूद केलेली अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या व्यक्तींमधून योग्य व्यक्तीच्या प्रतिनियुक्तीवरील बदलीद्वारे करण्यात येईल.

४. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या नियंत्रणाखालील रेशीम संचालनालयातील उपसंचालक, या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) सहायक संचालक हे पद धारण करणाऱ्या आणि त्या पदावरील तीन वर्षांहून कमी नसेल इतकी नियमित सेवा केलेल्या व्यक्तींमधून **वरिष्ठता** लक्षात घेऊन, काटेकोर निवडीच्या आधारे योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीद्वारे करण्यात येईल.

**किंवा**

(ख) (एक) ज्यांचे वय चाळीस वर्षांहून अधिक नसेल :

परंतु, अगोदरच शासकीय सेवेत असलेल्यांबाबत वयोमर्यादा पाच वर्षांनी शिथिल करण्यात येईल.

(दोन) ज्याने कृषीशास्त्र / रेशीम / जीवशास्त्र / प्राणीशास्त्र / वनस्पतीशास्त्र किंवा वस्त्रोद्योग अभियांत्रिकी यापैकी कोणत्याही विषयासह विज्ञान शाखेतील प्रथम श्रेणीतील पदवी धारण केली असेल ;

(तीन) वरील उपखंड (ख) (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता संपादन केल्यानंतर ज्याने कृषीशास्त्र / रेशीम / जीवशास्त्र / प्राणीशास्त्र / वनस्पतीशास्त्र किंवा वस्त्रोद्योग अभियांत्रिकी या विषयातील किमान तीन वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव आणि कोणत्याही उद्योगामधील किंवा शासकीय विभागातील किंवा सार्वजनिक क्षेत्र उपक्रमातील किंवा शासनाने अथवा महामंडळाने स्थापन केलेल्या सांविधिक प्राधिकरणातील / महामंडळातील जबाबदारीच्या पदावरील प्रशासकीय कामाचा पाच वर्षांचा अनुभव असा एकूण आठ वर्षांहून कमी नसेल इतका अनुभव धारण केला असेल किंवा संबंध विषयातील आठ वर्षांहून कमी नसेल इतका गुणवत्तापूर्ण संशोधनकार्याचा अनुभव धारण केला असेल,

(चार) ज्याला मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :

परंतु, ज्या उमेदवारांकडे त्या विषयातील असामान्य शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही असेल अशा उमेदवारांबाबत, आयोगाच्या शिफारशीनुसार, शासनाला, कमाल वयोमर्यादा शिथिल करता येईल :

परंतु, आणखी असे की, असामान्य अर्हता असणाऱ्या उमेदवारांबाबत आयोगाच्या शिफारशीनुसार, अनुभवाचा कालावधी शासनाला ४० टक्क्यांपर्यंत शिथिल करता येईल :

परंतु असेही की, रेशीम उत्पादन किंवा कृषीशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी किंवा संबधित विषयात असामान्य शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

**किंवा**

(ग) शासनाच्या इतर विभागात समकक्ष पद धारण करणाऱ्या आणि या नियमाच्या उपखंड (ख) (दोन) आणि उपखंड (ख) (तीन) मध्ये नमूद केलेली अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या व्यक्तींमधून योग्य व्यक्तीच्या प्रतिनियुक्तीवरील बदलीद्वारे करण्यात येईल.

५. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या नियंत्रणाखालील रेशीम संचालनालयातील सहायक संचालक या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-१ हे पद धारण करणाऱ्या आणि त्या पदावरील तीन वर्षांहून कमी नसेल इतकी नियमित सेवा केलेल्या व्यक्तींमधून वरिष्ठता लक्षात घेऊन, काटेकोर निवडीच्या आधारे पात्रतेच्या अधिनतेने व योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीद्वारे करण्यात येईल.

किंवा

(ख) (एक) ज्याचे वय अडतीस वर्षांहून अधिक नसेल :

परंतु, अगोदरच शासकीय सेवेत असलेल्यांबाबत वयोमर्यादा पाच वर्षांनी शिथिल करण्यात येईल.

(दोन) ज्याने कृषीशास्त्र / रेशीम / जीवशास्त्र / प्राणीशास्त्र / वनस्पतीशास्त्र किंवा वस्त्रोद्योग अभियांत्रिकी यांपैकी कोणत्याही विषयासह विज्ञान शाखेतील प्रथम श्रेणीतील पदवी धारण केली असेल ;

(तीन) वरील उपखंड (ख) (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता संपादन केल्यानंतर ज्याने कृषीशास्त्र / रेशीम / जीवशास्त्र / प्राणीशास्त्र / वनस्पतीशास्त्र किंवा वस्त्रोद्योग अभियांत्रिकी या विषयातील किमान तीन वर्षांचा प्रत्यक्ष अनुभव आणि कोणत्याही उद्योगामधील किंवा शासकीय विभागातील किंवा सार्वजनिक क्षेत्र उपक्रमातील किंवा शासनाने अथवा महामंडळाने स्थापन केलेल्या सांविधिक प्राधिकरणातील / महामंडळातील जबाबदारीच्या पदावरील प्रशासकीय कामाचा तीन वर्षांचा अनुभव असा एकूण सहा वर्षांहून कमी नसेल इतका अनुभव धारण केला असेल,

(चार) ज्याला मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल,

अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :

परंतु, ज्या उमेदवारांकडे त्या विषयातील असामान्य शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही असेल अशा उमेदवारांबाबत, आयोगाच्या शिफारशीनुसार, शासनाला, कमाल वयोमर्यादा शिथिल करता येईल :

परंतु, आणखी असे की, असामान्य अर्हता असणाऱ्या उमेदवारांबाबत आयोगाच्या शिफारशीनुसार, शासनाला अनुभवाचा कालावधी ४० टक्क्यांपर्यंत शिथिल करता येईल :

परंतु असेही की, रेशीम उत्पादन किंवा कृषिशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या किंवा त्या विषयात असामान्य शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

किंवा

(ग) शासनाच्या इतर विभागात समकक्ष पद धारण करणाऱ्या आणि या नियमाच्या उपखंड (ख) (दोन) आणि उपखंड (ख) (तीन) मध्ये नमूद केलेली अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या व्यक्तींमधून योग्य व्यक्तीच्या प्रतिनियुक्तीवरील बदलीद्वारे करण्यात येईल.

गट-ब

६. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या नियंत्रणाखालील रेशीम संचालनालयातील रेशीम विकास अधिकारी, श्रेणी-१ या पदावरील नियुक्ती एकतर.—

(क) रेशीम विकास अधिकारी श्रेणी-२ हे पद धारण करणाऱ्या आणि त्या पदावरील तीन वर्षांहून कमी नसेल इतकी नियमित सेवा केलेल्या व्यक्तींमधून वरिष्ठता लक्षात घेऊन, काटेकोर निवडीच्या आधारे पात्रतेच्या अधिनतेने व योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीद्वारे करण्यात येईल.

किंवा

(ख) (एक) ज्याचे वय पस्तीस वर्षांहून अधिक नसेल :

परंतु, अगोदरच शासकीय सेवेत असलेल्यांबाबत वयोमर्यादा पाच वर्षांनी शिथिल करण्यात येईल.

(दोन) ज्याने कृषीशास्त्र / रेशीम / जीवशास्त्र / प्राणीशास्त्र / वनस्पतीशास्त्र किंवा वस्त्रोद्योग अभियांत्रिकी यांपैकी कोणत्याही विषयासह विज्ञान शाखेतील प्रथम श्रेणीतील पदवी धारण केली असेल ;

(तीन) वरील उपखंड (ख) (दोन) मध्ये नमूद केलेली अर्हता संपादन केल्यानंतर ज्याने कोणत्याही उद्योगामधील किंवा शासकीय विभागातील किंवा सार्वजनिक क्षेत्र उपक्रमातील किंवा शासनाने अथवा महामंडळाने स्थापन केलेल्या सांविधिक प्राधिकरणातील / महामंडळातील कृषीशास्त्र / रेशीम / जीवशास्त्र / प्राणीशास्त्र / वनस्पतीशास्त्र किंवा वस्त्रोद्योग अभियांत्रिकी या विषयातील किमान तीन वर्षांचा प्रत्यक्ष धारण केला असेल,

(चार) ज्याला मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान असेल, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :

परंतु, ज्या उमेदवारांकडे त्या विषयातील असामान्य शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही असेल अशा उमेदवारांबाबत, आयोगाच्या शिफारशीनुसार, शासनाला, कमाल वयोमर्यादा शिथील करता येईल :

परंतु, आणखी असे की, असामान्य अर्हता असणाऱ्या उमेदवारांबाबत आयोगाच्या शिफारशीनुसार, अनुभवाचा कालावधी शासनाला ४० टक्क्यांपर्यंत शिथिल करता येईल :

परंतु असेही की, रेशीम उत्पादन या विषयात पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या किंवा त्या विषयात असामान्य शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

किंवा

(ग) शासनाच्या इतर विभागात समकक्ष पद धारण करणाऱ्या आणि या नियमाच्या खंड (ख) उपखंड (दोन) आणि खंड (ख) उपखंड (तीन) मध्ये नमूद केलेली अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या व्यक्तींमधून योग्य व्यक्तीच्या प्रतिनियुक्तीवरील बदलीद्वारे करण्यात येईल.

७. नियम ३, ४, ५ व ६ या प्रत्येक नियमाच्या खंड (ख) उपखंड (दोन) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर आयोगाला असे वाटले की अनुसूचित जाती, बौद्ध धर्मांतरितसह अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती किंवा भटक्या जमातीच्या उमेदवारांसाठी राखीव असलेल्या रिक्त जागा भरायला आवश्यक ती उच्चदर्जाची शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांची पुरेशी संख्या उपलब्ध नाही, तर ते, अशा निवडीबाबत त्याने निर्धारित केलेली पदवीतील श्रेणी संबंधीची अट शिथील करू शकेल आणि ते अशा जाती किंवा जमातीतील योग्य उमेदवाराची निवड करील.

८. नियम ५ आणि ६ मध्ये नमूद केलेल्या पदावरील पदोन्नतीद्वारे आणि नामनिर्देशनाद्वारे करावयाची नियुक्ती १:१ या गुणोत्तरानुसार करण्यात येईल.

९. नियम ३, ४, ५, ६ मधील पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती केलेली व्यक्ती, दोन वर्षांच्या परिविक्षाधीन कालावधीवर असेल. परिविक्षाधीन कालावधी जास्तीत जास्त फक्त एका वर्षापर्यंत वाढविता येईल. त्या पदावर नियुक्ती केलेल्या व्यक्तीला त्या पदासाठी विहीत केले असेल असे प्रशिक्षण घेणे आणि अशी विभागीय परीक्षा उत्तीर्ण करणे व परिविक्षा यशस्वीरीत्या पूर्ण करणे आवश्यक असेल. जर त्याने/तिने वाढवलेल्या परिविक्षा कालावधीत परीक्षा उत्तीर्ण केली नाही किंवा परिविक्षा यशस्वीरीत्या पूर्ण केली नाही अथवा तो/ती पदासाठी योग्य नाही असे आढळून आल्यास त्याला/तिला नोटीस न देता सेवेतून काढून टाकता येईल.

१०. नियम ३, ४, ५, ६ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्ती केलेल्या व्यक्तीने मग ती पदोन्नतीद्वारे किंवा नामनिर्देशनाद्वारे असो त्याबाबत करण्यात आलेल्या नियमानुसार हिंदी आणि मराठी भाषा परीक्षा जर तिने त्या अगोदरच उत्तीर्ण केल्या नसतील; किंवा तिला त्या उत्तीर्ण करण्यापासून सूट मिळालेली नसेल तर, उत्तीर्ण करणे अवश्यक असेल.

११. नियम ३, ४, ५, ६ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्ती केलेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाद्वारे वेळोवेळी विहीत करण्यात आलेले संगणक हाताळण्या बाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक असेल.

१२. नियम ५, ६ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्ती केलेली व्यक्ती, महाराष्ट्र राज्यात कुठेही बदली होण्यास पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

डॉ. सुधीरकुमार गोयल,
शासनाचे प्रधान सचिव.